# कोविड योद्ध्यांना रोगप्रतिकार शक्तिवर्धक औषधांचे वाटप

**मुंबई :** कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या अवघड परिस्थितीत डॉक्टर्स, नर्सेस, पोलीस कर्मचारी, स्वच्छता कामगार तसेच वितरक आपले जीव धोक्यात घालून सेवा देत आहेत. या पार्श्वभूमीवर क्वीक हील सीएसआरने श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्रासोबत हातमिळवणी करीत जवळजवळ १ लाख कोविड योद्ध्यांना 'रस माधव वटी' या रोगप्रतिकार शक्तिवर्धक औषधाचे वाटप केले आहे.

आयुर्वेदिक औषधी वनस्पतींपासून तयार केलेल्या या औषधाने सर्दी, खोकला, घसा दुखणे, अंगदुखी, थकवा अशा सामान्य विषाणूजन्य संक्रमणाच्या लक्षणांपासून सुरक्षा मिळते. तसेच या औषधाने पचन, रक्तशुद्धी व श्वासोच्छ्वासासंबंधीच्या तक्रारीतही लाभ होतो. क्वीक हील टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलाश काटकर म्हणाले, 'एक जबाबदार नागरिक म्हणून कोविडशी प्रत्यक्ष दोन हात करणाऱ्या आपल्या योद्ध्यांची सुरक्षा पाहणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. 'कोविड-१९ वॉरियर्सला' आयुर्वेदिक औषधांद्वारे सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय आणि संशोधन केंद्राशी सहकार्य करण्यात आम्हाला आनंद होत आहे. भविष्यातदेखील आम्ही देशासाठी लढणाऱ्या योद्ध्यांच्या संरक्षणासाठी असे आणखी संभाव्य पुढाकार घेत राहू. तर श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राचे अध्यक्ष आनंदनाथ सांगवडेकर यांनी म्हटले की, कोविड-१९ शी लढा देण्यासाठी सेवा कर्मचाऱ्यांनी आपले प्राण पणाला लावले आहेत. हे कर्मचारी वारंवार बाधित व्यक्तींच्या संपर्कात येतात त्यामुळे त्यांना संक्रमणाचा धोकाही सर्वाधिक असतो. क्वीक हीलसोबत आमच्या 'रस माधव वटी' या रोगप्रतिकार शक्तिवर्धक औषधाद्वारे आम्ही त्यांना एक सुरक्षा कवच नक्कीच देऊ शकू. हे औषध कोल्हापूर येथील धर्मादाय संस्था श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व संशोधन केंद्राने बनवले आहे. आमच्या या पुढाकाराने कदाचित या लढ्यास थोडेसे बळ मिळेल.